सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१ निशाणी क्र.१२

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – नागेश निवृत्ती कदम

वय – ४९ वर्षे, व्यवसाय – कृषिसेवा केंद्र

पत्ता – रा. गायगाव, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत दुपारी ०१.३५ वाजता सरतपास सुरुः**

१. घटना दि.२७.०१.२०२१ रोजी सकाळी ९ ते ९.१५ च्या दरम्यानची आहे. सदर घटना बाकराबाद येथे घडलेली आहे. त्यावेळी नितीन भाकरे यांची गाडी रिव्हर्स घेत असताना रायभान माळी गाडीच्या मागील दिशेने येत असताना, रायभान माळी हे गाडीच्या मागे पडले आणि गाडीचे मागचे चाक रायभान माळी यांच्या अंगावरुन गेले. त्या ठिकाणावर रायभान माळी यांच्या नातेवाईकांसह इतर लोकांची गर्दी जमली होती. गाडीचा क्रमांक मला सांगता येणार नाही. सचिन माळी यांना मी ओळखत असून ते रायभान माळी यांचा मुलगा आहेत. मयत रायभान माळी यांचा मृत्यु गाडीचे चाक अंगावरुन गेल्यामुळे झाला होता. पोलीसांनी घटनेविषयी चौकशी करुन माझे बयाण माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतले होते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे**

२. मी गायगाव येथील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव पासून बाकराबाद हे अंतर ५ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव ते बाकराबाद हा रस्ता कच्चा डांबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोरगाव भाकरे येथून बाकराबादकडे जाणारा रस्ता खराब आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही. मी स्वतःहुन सांगतो की, घटना घडली त्यावेळी मी बाकराबाद गावामध्ये पुलावर उभा असताना घटना घडलेली आहे.

३. रायभान माळी हे पडले होते, ही विधान मी माझे बयाण नोंदवितेवेळी पोलीसांना कथन केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पडले होते हा शब्द मी आज रोजी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे. रायभान माळी हे गाडीच्या मागे पडले आणि गाडीचे

मागचे चाक रायभान माळी यांच्या अंगावरुन गेले, हे विधान मी पोलीसांना बयाण नोंदवितेवेळी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर विधान आज रोजी मी प्रथमच न्यायालयात कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही.

४. घटनेची वेळी सकाळी ९ ते ९.१५ होती हे मी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ९ ते ९.१५ ही वेळ मी आज पहिल्यांदा सांगत आहे. मी स्वतःहुन सांगतो की, त्यावेळी घटनेची वेळ मी ९ ते १० अशी सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे आणि माझे पटत नसल्यामुळे मी त्याच्या विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास दुपारी ०१.५१ वाजता पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १७.०१.२०२५**

| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
|---|---|
| | VISHNU DATTARAO GITE — Digitally signed by VISHNU DATTARAO GITE Date: 2025.01.17 17:38:28 +0530 |
| **(विष्णु द. गिते)**<br>**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**(न्यायालय क्र.२), बाळापूर.** | **(विष्णु द. गिते)**<br>**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**(न्यायालय क्र.२), बाळापूर.** |

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १७/०१/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १७/०१/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १७/०१/२०२५ |